
दै. देशोन्नति दि. 05/12/25

# एकाच वेळी ५ रेती घाटावर कारवाई; २ कोटींवर मुद्देमाल जप्त

## नांदेड ग्रामीण पोलिसांची कारवाई ; गुन्हा दाखल





देशोन्नती वृत्तसंकलन

**नांदेड** : नांदेड ग्रामीण पोलिसांनी ४ डिसेंबर रोजी एकाच वेळी ५ रेती घाटावर कारवाई करून २ कोटी २७ लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. यावेळी काही साहित्य जाळून नष्ट करण्यात आले असून पोलिसांनी ८ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या आदेशावरून करण्यात आली.

नांदेड ग्रामीण पोलिसांनी ४ डिसेंबर रोजी दिवसभरात वांगी, इंजेगाव, नागापुर, सिध्दनाथ, पुणेगाव तसेच बारड व मुदखेड हद्दीतील गोदावरी नदीपात्रात चोरुन लपुन अवैध रेती उपसा होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर योग्य तो सापळा लाऊन सकाळी ९ वाजता सर्व अधिकारी व अंमलदार हे बोट, हायड्रोजन कटर, पेट्रोल, ड्रोन व इतर आवश्यक साहित्यासह गोदावरी नदीपात्रातील रेती घाटावर जाऊन एकाचवेळी छापा कारवाई केली. सदर ठिकाणी गोदावरी नदीपात्रातील रेती फायबरच्या साहाय्याने मोठ्या बोटमध्ये भरुन नदी किनाऱ्यावर आणुन मजुरांच्या साहाय्याने इंजिन व तराफ्याद्वारे रेती चोरी चालु असताना सदर ठिकाणी जाऊन छापा कारवाई केली. नदीतील व नदी किनाऱ्यावर लावलेल्या बोटी या जप्त करुन हायड्रोजन कटरच्या सहाय्याने कापुन बुडवुन नष्ट केल्या. तसेच तराफे व इंजीन जाळुन, कापुन नष्ट केले व काही मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदर घटनास्थळांवरुन एकुण २ कोटी २७ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी पोकॉ समीर शेख यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नांदेड ग्रामीण पोलिसांनी योगेश मस्के, देवानंद मस्के, महेश मस्के व साईनाथ मस्के सर्व रा. नागापूर, धोंडिबा सोनटक्के, ग्यानु पुयड, संभाजी पुयड, दोघे रा. पुणेगाव व तुकाराम ठोके रा. इंजेगाव यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाई पथकात पोनि ओमकांत चिंचोलकर, पोउपनि ज्ञानेश्वर मटवाड, पोहेकॉ अर्जुन मुंडे, शेख सत्तार, शंकर मालगे, सिरममलवार, कोठेकर, शेख जमीर, शेख आसिफ, धम्मपाल कांबळे यांचा समावेश होता.